# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे ४११०३७.

-------------------------------------------------------------

## ❋ प्रेस नोट ❋

## ❋ कर्मचाऱ्यांसाठी परिवहन महामंडळाचे वतीने गृहप्रकल्प माहितीबाबत कार्यशाळा ❋

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे वतीने परिवहन महामंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र क्षेत्र विकास व गृहनिर्माण महामंडळ लि. पुणे विभाग व पिंपरी—चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अंतर्गत असणाऱ्या गृहसंकुलांची माहिती बाबत कार्यशाळा रोजी मा. नयना गुंडे, (भा.प्र.से) अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे संकल्पनेतून आज आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन मा. नयना गुंडे, (भा.प्र.से) अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे शुभहस्ते झाले. याप्रसंगी महाराष्ट्र क्षेत्र विकास व गृहनिर्माण महामंडळ लि. पुणे विभाग यांचे मा. श्री. अशोक काकडे, मुख्य अधिकारी, मा. श्री.युवराज नाकाडे, कार्यकारी अभियंता तसेच पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाचे श्री.मोहन साखळकर, श्री.रमाकांत भुतडा, सौ.केतकर वास्तुविशारद तसेच परिवहन महामंडळाकडील मा. श्री.पंकज गिरी, प्रभारी सहव्यवस्थापकिय संचालक तथा मुख्य अंतर्गत अर्थान्विक्षक, श्री. विलास बांदल, महाव्यवस्थापक (संचलन व सेवा), श्री.शिवाजी जाधव, कार्यकारी अभियंता, श्री.योगेश होले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व इतर अधिकारी व कामगार मोठया संख्येने उपस्थित होते.

मा. नयना गुंडे यांनी सदर प्रसंगी परिवहन महामंडळाचे कर्मचाऱ्यांना स्वत:चे घर पुणे व पिंपरी चिंचवड परिसरात महाराष्ट्र शासनाचे या उपक्रमाअंतर्गत मिळणे शक्य असून या बाबत महामंडळाचे चालक, वाहक तसेच अन्य सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना माहिती करुन देणेचे उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले असून कर्मचाऱ्यांनी त्याचा लाभ घेणे आवश्यक आहे असे सांगितले.

सदर कार्यशाळेमध्ये कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र क्षेत्र विकास व गृहनिर्माण महामंडळ लि. पुणे विभागाचे अंतर्गत अत्यल्प, अल्प, मध्यम व उच्च उत्पन्न गटामधील विविध ठिकाणी उपलब्ध असलेल्या गृहप्रकल्पांबाबतची माहिती तसेच या योजनेअंतर्गत घर मिळविण्यासाठी

करावयाची कार्यपध्दती याबाबत सविस्तर महिती प्रत्याक्षिकासह मा. श्री. काकडे, मुख्य अधिकारी यांनी दिली.

तसेच कर्यशाळेमध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे वतीने सेक्टर १२ मध्ये विकसित करण्यात येणाऱ्या नियोजित गृहप्रकल्पा बाबतची तपशीलवार माहिती, कार्यपध्दती याबाबत वास्तुविशारद श्री. साखळकर व सौ. केतकर यांनी दिली.

sd/-
**प्र.सहव्यवस्थापकिय संचालक**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---

मा.संपादक, दिनांक: २४/०५/२०१८
दैनिक.......
यांजकडेस........
महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या महितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.

मा.स.कळावे.

sd/-
**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**